RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ९] गुरुवार, मे ३०, २०१३/ज्येष्ठ ९, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.—महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. .. .. .. .. | १-३ |

---

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मे २०१३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2013.**

*AN ORDINANCE*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.

**सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९९४ चा महा. ३५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१३ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ याच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९९४ चा महा. ३५.

"(३) प्रतिकुलगुरुचा पदावधी, कुलगुरुच्या पदावधीबरोबरच समाप्त होणे किंवा त्याचे वय, नियत सेवावधी पूर्ण होण्याएवढे होणे, यांपैकी जी घटना अगोदर घडेल, तोपर्यंत असेल.".

## निवेदन

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) याच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) मध्ये अशी तरतूद आहे की, कुलपती, कुलगुरुशी विचारविनिमय केल्यानंतर ज्या विद्यापीठाशी १५० पेक्षा अधिक संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था असतील, अशा विद्यापीठासाठी प्रतिकुलगुरुची नियुक्ती करील.

उक्त कलम १३ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, प्रतिकुलगुरुचे पद धारण करणारी व्यक्ती ही, जिला किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल व जिने महाविद्यालयाच्या अथवा परिसंस्थेच्या प्राध्यापकाचे किंवा प्राचार्यांचे पद धारण केले असेल, अशी व्यक्ती असेल.

उक्त कलम १३ च्या पोट-कलम (३) मध्ये अशी तरतूद आहे की, प्रतिकुलगुरुचा पदावधी हा कुलगुरुच्या पदावधीबरोबरच समाप्त होणे किंवा त्याच्या वयाची ६० वर्षे पूर्ण होणे, यांपैकी जी घटना अगोदर घडेल तोपर्यंत असेल.

२. शासनाने, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) शिफारशीनुसार, प्राध्यापकांच्या आणि प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात अनुक्रमे ६२ व ६५ वर्षे असा बदल केला आहे. त्यानुसार, प्रतिकुलगुरुचा पदावधी हा, कुलगुरुच्या पदावधीबरोबरच समाप्त होणे किंवा त्याचे वय, नियत सेवावधी पूर्ण होण्याएवढे होणे, यांपैकी जी घटना अगोदर घडेल, तोपर्यंत असेल, अशी तरतूद करणे इष्ट वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात, महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ (सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५) महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये दिनांक २ एप्रिल २०१३ रोजी पुरःस्थापित करण्यात आले होते व ते दिनांक १६ एप्रिल २०१३ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेने संमत केले होते. तथापि, दिनांक १८ एप्रिल २०१३ रोजी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची सत्र समाप्ती झाल्यामुळे, उक्त विधेयक महाराष्ट्र विधानसभेकडून संमत होऊ शकले नाही. आता उक्त विधेयक राज्य विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विचारात घेता येईल. तथापि, दरम्यानच्या काळात काही विद्यापीठांच्या प्रति-कुलगुरुंचा पदावधी, त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण होत असल्यामुळे, समाप्त होईल. म्हणून, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्ये उक्त सुधारणा तात्काळ करणे इष्ट वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३० मे २०१३.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक १८] गुरुवार, मे ३०, २०१३/ज्येष्ठ ९, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक ३२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2013 (Mah. Ord. VIII of 2013), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2013 (Mah. Ord. VIII of 2013), published under authority of the Governor).

---

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**
Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 30th May 2013.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2013.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Universities Act, 1994.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Universities Act, 1994, for the purposes hereinafter appearing; Mah. XXXV of 1994.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2013.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 13 of Mah. XXXV of 1994.

**2.** In section 13 of the Maharashtra Universities Act, 1994, for sub-section (*3*), the following sub-section shall be substituted, namely :— Mah. XXXV of 1994.

"(*3*) The term of the Pro-Vice-Chancellor shall be co-terminus with that of the Vice-Chancellor or till he attains the age of superannuation, whichever is earlier.".

## STATEMENT

Sub-section (*1*) of section 13 of the Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994), provides that the Chancellor may, in consultation with the Vice-Chancellor, appoint a Pro-Vice-Chancellor for the University, which has more than 150 affiliated colleges and recognized institutions.

Sub-section (2) of the said section 13 provides that, the Pro-Vice-Chancellor shall be a person, who has held the post of Professor or Principal of a college or an institution having not less than 15 years teaching experience.

Sub-section (*3*) of the said section 13 provides that the term of the Pro-Vice-Chancellor shall be co-terminus with the term of office of the Vice-Chancellor or till he attains the age of 60 years, whichever is earlier.

2. The Government, on the recommendation of the University Grants Commission (U.G.C.), has changed the retirement age of the Professors and Principals as 62 and 65 years, respectively. Accordingly, it is expedient to provide that the term of the Pro-Vice-Chancellor shall be co-terminus with that of the Vice-Chancellor or till he attains the age of superannuation, whichever is earlier.

3. To achieve the above objectives, in the Budget Session of the State Legislature, the Maharashtra Universities (Amendment) Bill, 2013 (L. C. Bill No. V of 2013) was introduced in the Maharashtra Legislative Council on the 2nd April 2013 and passed by the Maharashtra Legislative Council on the 16th April 2013. However, the said Bill could not be passed by the Maharashtra Legislative Assembly, as the session of both Houses of the State Legislature was prorogued on the 18th April 2013. The said Bill can now be taken up for consideration only in the Monsoon Session of the State Legislature. However, in the meanwhile, the term of Pro-Vice-Chancellors of certain Universities is coming to an end, on their attaining the age of 60 years. It is, therefore, considered expedient to carry out the said amendment in the Maharashtra Universities Act, 1994, immediately.

4. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai, K. SANKARANARAYANAN,
dated the 30th May 2013. Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY KUMAR,
Principal Secretary to Government.